**प्रेस नोट ता. ०३/०९/२०२३      पोलीस स्टेशन - वाकड**

# २८ वर्षे तुरुंगात काढणा-या व पुणे शहराला हादरविणारे 'राठी हत्याकांडातील' मुख्य आरोपीस अफीमचे तस्करी मध्ये अटक

# ८९८ ग्रॅम अफीम जप्त

## वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- oo ---

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात अंमली पदार्थाचे विक्री बाबत **मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड,** यांनी सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना जास्तीत जास्त पोलीस अंमलदार नेमुन सतर्क पेट्रोलींग, सक्त नाकाबंदी करुन अंमली पदार्थांची तस्करी करणारे लोकांची माहीती काढुन त्यांना अटक करुन अंमली पदार्थांचे तस्करीला प्रतिबंध घालणेबाबत आदेश दिले आहेत.

मा.श्री. गणेश जवादवाड,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण यांना सोबतचे पोलीस अंमलदार यांना पारंपारीक व तांत्रीक तपासाद्वारे अंमली पदार्थांची तस्करी करणारे लोकांचा शोध घेवुन त्यांना अटक करुन अंमली पदार्थ जप्त करणेबाबत सुचना दिल्या आहेत.

तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी आप-आपले विश्वासु बातमीदारामार्फत पिंपरी चिंचवड मध्ये होणा-या अंमली पदार्थाचे तस्करीबाबत माहीती काढणेचे काम सुरु केले.त्यासाठी अंमली पदार्थाच्या गुन्हयातील रेकॉर्डवरील आरोपी चेक करुन त्यांचेकडुन माहीती काढणेचे काम सुरु केले.

दि.०२/०९/२०२३ रोजी सपोनि.संतोष पाटील व त्यांचे सोबतचे पोलीस अंमलदार असे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना मुंबई पुणे हायवे लगत सिल्व्हर जिमकडे जाणारे रोडचे कोप-यावर वाकड पुणे येथे एक इसम गडबडलेल्या अवस्थेत उभा असलेला दिसला. त्याचे हातात पांढरे रंगाची पिशवी दिसली व आम्हा पोलीसांना पाहुन पळुन जाणेचे स्थितीत दिसल्याने त्याचे हालचालींबाबत शंका आलेने त्यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याचे ताब्यातील पिशवीची पाहणी केली असता त्यामध्ये अफीम हा अंमली पदार्थ असल्याचे दिसुन आले. त्यास ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारला असता त्याने स्वतःचे नाव नारायण चेतनराम चौधरी वय ४१ वर्षे रा.जालबसर, बिकानेर, राजस्थान असे सांगीतले. त्याचे ताब्यात मिळुन आलेल्या पदार्थाची अंमली पदार्थ तपासणी किट द्वारे तपासणी केली असता तो पदार्थ अफीम असल्याचे निष्पन्न झालेने कायदेशीर पंचनामा करुन एकुण ८९८ ग्रॅम वजनाचा अफीम हा अंमली पदार्थ जप्त करणेत आला आहे. सदर अफीमची बाजारात किं.४००/- रु प्रति ग्रॅम अशी असुन जप्त मालाची एकु ण किंमत ३,५९,२००/- रुपये एवढी आहे. आरोपीस माल कोणाकडुन आणला याबाबत चौकशी केली असता त्याने सुगनाराम रा.उदरासर बिकानेर राजस्थान याचा माल असलेबाबत सांगीतले. सदरबाबत वाकड पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ८६९/२०२३ एन.डी.पी.एस.ॲक्ट कलम ८(क), १७(ख) व २९ प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला आहे.

आरोपी नारायण चौधरी याचेकडे तपास केला असता धक्कादायक माहीती समोर आली की, त्याने व त्याचे साथीदारांनी मिळुन २६ ऑगस्ट १९९४ मध्ये पौड रोड, कोथरुड पुणे परीसरात राहणारे एकाच कुटुंबातील ०७ सदस्यांची लुटमार करणेचे उद्देशाने निघृणपणे हत्या केली होती. त्याबाबत कोथरुड पोलीस स्टेशन गु.रजि.नं. २१८/१९९४ भादविक ३०२,३४२,१२०(ब), ३९२, २९७,४४९, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असुन आरोपीस दि.०५/०९/१९९४ रोजी राजस्थान येथुन अटक करणेत आली होती. त्यानंतर आरोपी व त्याचे साथीदार यांना १९९८ मध्ये फाशीची शिक्षा झाली होती. सदर आरोपी मागील २८ वर्षापासुन महाराष्ट्रातील वेगवेगळया जेल मध्ये वास्तव्यास होता. २७ मार्च २०२३ मध्ये सुप्रिम कोर्ट, दिल्ली यांनी आरोपी नारायण चौधरी यास तो गुन्हयाचेवेळी विधीसंघर्षीत

असल्याकारणाने त्याची फाशीची शिक्षा रद्द करुन त्यास मुक्त केले होते. सदरचा आरोपी जेल मधुन बाहेर आले नंतर त्याचे मुळगावी राजस्थान येथे गेला होता. तेथे त्याची ओळख इसम नामे सुगनाराम रा.उदरासर बिकानेर राजस्थान याचे सोबत झाली त्याचे सांगणे वरुन तो पुणे येथे अफीम या अंमली पदार्थाची तस्करी करणेकरीता आला होता.

नारायण चेतनराम चौधरी यास गुन्हयात अटक करणेत आली असुन त्याची दि.०६/०९/२०२३ रोजी पर्यत पोलीस कोठडी रिमांड प्राप्त झाला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.संजय शिंदे सो, सह.पोलीस आयुक्त, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि-२ पिंपरी चिंचवड, मा. श्री.डॉ. विशाल हिरे, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री.गणेश जवादवाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि.संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.वंदु गिरे, पोहवा.संदीप गवारी, पोहवा.दिपक साबळे, पोहवा.प्रमोद कदम, पोहवा.अतिश जाधव, पोना.अतिक शेख, पोना.प्रशांत गिलबीले, पोशि.भास्कर भारती, पोशि.सौदागर लामतुरे, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि.विनायक घारगे, पोशि.कौंतेय खराडे, पोशि.सागर पंडीत (परि-०२ कार्यालय) यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड